Sakal, Pune, 2013

स्वप्निल शिंदे



# अंधश्रद्धा निर्मूलनासाठी आक्रमक स्वरूप टाळावे

## ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर यांचे मत

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

'आक्रमक स्वरूप धारण करून, अंधश्रद्धा निर्मूलनाचा प्रयत्न झाल्यास लोक त्यापासून दूर जाण्याऐवजी अंधश्रद्धांनाच धरून राहतील. त्यामुळे अंधश्रद्धा निर्मूलनाच्या प्रसारासाठी सौम्य शब्दांमध्ये आणि समोरच्या व्यक्तीला पटेल अशा स्वरुपामध्ये काम करण्याची आवश्यकता आहे,' असे मत ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर यांनी पुण्यात व्यक्त केले.

'आइज ऑन आयसॉन महाराष्ट्र व्यासपीठातर्फे बुधवारी 'वैज्ञानिक दृष्टिकोन' या विषयावर चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. त्यामध्ये डॉ. नारळीकर बोलत होते. 'साधना'चे संपादक विनोद शिरसाठ, 'लोकविज्ञान'चे डॉ. अनंत फडके, डॉ. पुष्पा भावे या वेळी व्यासपीठावर उपस्थित होत्या. डॉ. प्रियदर्शनी कर्वे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

अंधश्रद्धा निर्मूलनासाठीच्या डॉ. दाभोलकर यांच्या कार्याचा डॉ. नारळीकर यांनी या वेळी गौरव केला. तसेच, अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कार्याची दिशा कशी असावी, याविषयी त्यांनी मत मांडले. अंधश्रद्धांविरोधात सौम्य भाषेत समुपदेशनाचे कार्य केल्यास, त्याचा अधिक प्रभाव दिसून येईल. त्यातून समाजाची मानसिकता बदलण्यास मदत होण्याविषयीची आशा डॉ. नारळीकर यांनी व्यक्त केली.

डॉ. नरेंद्र दाभोलकर यांना समर्पित या चर्चासत्रामध्ये डॉ. नारळीकर यांनी 'फलज्योतिष्याची वैज्ञानिक चाचणी' या विषयावर मार्गदर्शन केले. 'अलेक्झांडरच्या काळात भारतामध्ये रुजलेले फलज्योतिष्य हे 'इम्पोर्टेड नॉलेज' आहे. केवळ शक्यतांवर आधारित असलेल्या या शास्त्रापेक्षा वस्तुनिष्ठ तथ्यांवर आधारित वैज्ञानिक दृष्टिकोन आचरणात आणणे समाजासाठी हितावह आहे,' असे ते म्हणाले. फलज्योतिष्याचा फोलपणा स्पष्ट करणाऱ्या विविध प्रयोगांचीही त्यांनी माहिती दिली.

'पत्रकारिता व विज्ञानातील मूलभूत तत्वांमध्येच तफावत असल्याने विज्ञानवादी दृष्टिकोन प्रसारमाध्यमांमधून रुजत नाही, असे वैज्ञानिक दृष्टिकोनामध्ये प्रसारमाध्यमांची भूमिका,' या विषयावर बोलताना शिरसाट म्हणाले.